# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी ४११ ०१८

## दिनांक १७/७/२०२३ रोजीच्या ऑनलाईन परिक्षेच्या प्रवेशपत्राबाबत जाहीर निवेदन (जाहीरात क्रमांक- १८४/२०२२)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट ब व गट क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.१८४/२०२२ नुसार अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत आले होती.

दिनांक २८/०५/२०२३ रोजी संघ लोकसेवा आयोगाची पूर्वपरिक्षा होती,त्यामुळे काही उमेदवारांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची ऑनलाईन परिक्षा देता आली नसल्याने अशा उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा घेण्याची बाब विचाराधीन होती. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०९/०५/२०२३ रोजीचे जाहिर प्रकटनाद्वारे ज्या उमेदवारांनी मुदतीत त्यांची माहिती पाठविली होती अशा उमेदवारांची **दिनांक १७/०७/२०२३ रोजी** ऑनलाईन परिक्षा घेण्यात येणार असून या पदांच्या ऑनलाईन परिक्षेकरीता प्रवेशपत्र (Admit Card) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावरील भरती या मेनूमध्ये लिंक **दिनांक ०७/०७/२०२३ पासून** उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उमेदवारांनी वरीलप्रमाणे लिंकवर अर्ज क्रमांक (Application no.) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड (Password) नमूद करुन ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र(Admit Card) उपलब्ध करुन घ्यावे.

ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) डाऊनलोड करण्याबाबत काही तांत्रीक अडचणी आल्यास उमेदवारांनी सोमवार ते शनिवार या दिवशी फक्त सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत Hepldesk Number +91 7353293111 या क्रमांकावर तसेच Helpdesk Email- pcmchelpdesk2022@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) उपलब्ध करुन घेणे,परिक्षेस वेळेवर उपस्थित राहणे ही संबंधित उमेदवारांची जबाबदारी आहे. संकेतस्थळावरील प्रवेशपत्र पाहिले नाही, अथवा डाऊनलोड करणेस अडचण आली, इत्यादी कारणे ऑनलाईन परिक्षेचे वेळेस विचारात घेतली जाणार नाहीत. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - साप्रवि/१/कावि/४८५/२०२३
दिनांक ०६/०७/२०२३

**दिनांक १७/०७/२०२३ रोजीच्या ऑनलाईन परिक्षेच्या प्रवेशपत्राची (Admit Card) लिंक**

https://cdn3.tcsion.com/EForms/configuredHtml/32281/78492/login.html